# 'डीईपी'तील ५१ टक्के हिस्सा 'ऑटोलाइन'च्या ताब्यात

**पुणे, ता. ११ :** अमेरिकेतील 'डेट्रॉईट इंजिनिअर्स प्रॉडक्ट्स'मधील (डीईपी) ५१ टक्के हिस्सा पुण्यातील 'ऑटोलाइन इंडस्ट्रीज'ने सुमारे ७६ लाख डॉलरला विकत घेतला असल्याची माहिती कंपनीचे अध्यक्ष गोपाळ पटवर्धन यांनी आज येथे दिली.

ते म्हणाले, की 'डीईपी'मधील ५१ टक्के हिस्सा विकत घेण्याचा व्यवहार रोख आणि शेअर स्वरूपात झाला आहे. 'ऑटोलाइन'ने २४ लाख डॉलर रोख स्वरूपात, तर कंपनीचे ५.२ लाख शेअर प्रतिशेअर चारशे रुपये किमतीने 'डीईपी'ला दिले आहेत. 'डीईपी'ची न्यूव्हेंट ही उपकंपनी असून, चेन्नईत तिचे कार्यालय आहे. ही कंपनीसुद्धा 'ऑटोलाइन'च्या ताब्यात आली आहे. चालू आर्थिक वर्षात 'ऑटोलाइन'तर्फे कर्मचाऱ्यांची संख्या शंभरवरून दीडशेवर नेली जाणार आहे, तर पुढील दोन वर्षांत ती साडेतीनशेवर नेण्याचा विचार आहे.

'डीईपी' ही अभियांत्रिकी सॉफ्टवेअर आणि अभियांत्रिकी सेवा पुरविणारी कंपनी आहे. कंपनीच्या विविध सॉफ्टवेअरचा उपयोग हवाई आणि वाहन क्षेत्रातील कंपन्या करतात. जनरल मोटर्स, फोर्ड, होंडा, ह्युंदाई आदी कंपन्या 'डीईपीच्या ग्राहक आहेत. याचा फायदा 'ऑटोलाइन'ला 'आउटसोर्स इंजिनिअरिंग' उत्पादनाच्या क्षेत्रात होणार आहे. या व्यवहारामुळे जपान, अमेरिका आणि कोरियाच्या बाजारपेठेत प्रवेश करता येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

'डीईपी'ला गेल्या आर्थिक वर्षात तीस लाख डॉलरचे उत्पन्न मिळाले असून, चालू आर्थिक वर्षात ते पन्नास लाख डॉलरवर जाण्याची अपेक्षा आहे. 'कॅड', 'कॅम'ची बाजारपेठ चार अब्ज डॉलरची आहे, असे कंपनीचे अध्यक्ष राधा कृष्णन यांनी सांगितले.